◆ शनिवार दि. १५ ऑगस्ट २०२६

◆ किंमत २ रुपये

◆ वर्ष : १ ला, अंक : १२३, पाने ८

PRG/ NO. MHMAR/25/A4138

संपादक: अनिल डि.जाधव 9637733531, 7218506402

कुशल भारत

सामान्य जनतेचे मुखपत्र

Email : kushalbharat2023@gmail.com

'Cyber Shiksha for Cyber Suraksha' अंतर्गत न्यू सांगवी येथील एस. जे. एच. गुरुनानक हायस्कूलमध्ये सायबर जनजागृती सत्र

न्यू सांगवी, पुणे :

डॉ. डी. वाय. पाटील ए.सी.एस. कॉलेज, पिंपरी येथील Quick Heal Cyber Warriors Club च्या वतीने "Cyber Shiksha for Cyber Suraksha" या प्रकल्पांतर्गत S.J.H. Gurunanak High School, New Sangvi येथील विद्यार्थ्यांसाठी सायबर जनजागृती सत्र आयोजित करण्यात आले.

या सत्राचे आयोजन व मार्गदर्शन नेहा माडीवाळकर आणि प्रणाली माने यांनी केले. विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात इंटरनेट, सोशल मीडिया आणि विविध डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करताना कोणती कांळजी घ्यावी, याबाबत सोप्प्या व समजण्यासारख्या पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले.

या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना Digital Footprint, सोशल मीडियाचा सुरक्षित व जबाबदार वापर, Gaming As डाउनलोड करताना घ्यावयाची काळजी, Cyber Bullying, सुरक्षित Passwords, Photo Morhing, Dark Web, Deefake तसेच विविध Cyber Safety Tips व सायबर क्राईम रिपोर्टिंग (१९३० आणि -पान २ वर)

ही संपूर्ण सायबर जनजागृती मोहीम Quick Heal Foundation च्या Chairerson सौ. अनुपमा कटकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. तसेच डॉ. डी. वाय. पाटील ए.सी.एस, कॉलेज, पिंपरीचे प्राचार्य डॉ. रणजित पाटील सर आणि शिक्षक समन्वयक श्री. सत्यवान कुंजीर सर यांनी क्लबच्या विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन, सहकार्य आणि प्रोत्साहन दिले. सायबर गुन्ह्यांपासून बचाव करण्यासाठी जागरूकता, सावधगिरी आणि जबाबदार डिजिटल वापर अत्यंत आवश्यक आहे.

'सावध क्लिक करा, सुरक्षित डिजिटल भविष्य घडवा!' "My Data, My Responsibility – Think Before You Click!" स्वत: व बचाव कसा करावा, हे अधिक प्रभावीपणे समाजातून सांगण्यात आले.

या वर्षाच्या प्रकल्पाची मुख्य संकल्पना "My Data, My Responsibility" अशी आहे. आपल्या वैयक्तिक माहितीची सुरक्षितता ही प्रत्येकाची स्वत:ची जबाबदारी आहे, हा संदेश या उपक्रमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

या उपक्रमाला शाळेतील शिक्षकांनी उत्तम सहकार्य केले. विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या सायबर सुरक्षिताच्या माहितीबद्दल शिक्षकांनी समाधान व्यक्त केले तसेच अशा प्रकारच्या जनजागृती सत्रांमुळे विद्यार्थ्यांना डिजिटल जगात अधिक सुरक्षितपणे वावरता येईल, असे मत व्यक्त केले.

"Cyber Shiksha for Cyber Suraksha" .... www.cybercrime.gov.in याबाबत देखील माहिती देण्यात आली.

सायबर गुन्ह्यांमधील खरे आणि बनावट सापळे ओळखता यावेत, यासाठी Hacker's Mask च्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी मनोरंजक खेळ व उपक्रम घेण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना सायबर गुन्हेगारांकडून निर्माण केले जाणारे बनावट सापळे, फसवणुकीच्या पद्धती आणि त्यापासून स्वत: च बचाव कसा करावा, हे अधिक प्रभावीपणे समाजातून सांगण्यात आले.

त्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी मनोरंजक खेळ व उपक्रम घेण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना सायबर गुन्हेगारांकडून निर्माण केले जाणारे बनावट सापळे, फसवणुकीच्या पद्धती आणि त्यापासून विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांची तक्रार कशी करावी, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. सायबर गुन्ह्यांसाठी www.cybercrime.gov.in या पोर्टलवर तक्रार बावतचे अधिक सायबर फसवणुकीच्या प्रकरणी 1930 या हेल्पलाईन आहे.